SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३१४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२५ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## राज्यात सध्या कुठेही लोडशेडिंग नाही!

# मुख्यमंत्र्यांचा थेट सभागृहात दावा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, मुंबई :** राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये वीजेच्या टंचाईमुळे भारनियमन केलं जात असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र राज्यात सध्या कोणतेही भारनियमन केले जात नसल्याचा दावा केला आहे. सध्या वीजेची कोणतीही टंचाई नसून कृषी पंपांना नियमानुसार दिवसा आठ तास वीजपुरवठा केला जात आहे. राज्यातील सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली असून उर्वरित २५ टक्के शेतकऱ्यांनाही यावर्षाअखेरीस दिवसा वीजपुरवठ्याच्या कक्षेत आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत आमदार सदाभाऊ खोत यांनी प्रश्न उपस्थित केला होता, तर आमदार बच्चू कडू, प्रविण दरेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मे महिन्यात काही वीज निर्मिती प्रकल्पांमध्ये एकाच वेळी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने अल्पकाळासाठी भारनियमन करावे लागले होते. मात्र सध्या राज्यात कोणतेही भारनियमन करण्यात येत नाही. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या सौर कृषी पंप योजनेंतर्गत विविध भौगोलिक परिस्थितींना अनुरूप मॉडेल विकसित करण्यात आली आहेत.

नदीकाठ, पूररेषा, कालवे तसेच खोल जलस्रोतांमधून पाणी उपसा करण्यासाठी मोनोपोल, बूस्टर पंप आणि तरंगत्या सौर पंपांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात १० लाखांहून अधिक सौर पंप बसविण्यात आले असून शेतकऱ्यांकडून या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला.

वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत राज्यात सुमारे २५ हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये फीडर विभक्तीकरण, नवीन उपकेंद्रे, अतिरिक्त रोहित्रे (डीपी) आणि वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. पुढील तीन वर्षांत या कामांमुळे डीपी निकामी होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर २०३१-३२ पर्यंत ७८ हजार मेगावॅट वीज क्षमता उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या क्षमतेचे प्रभावी वहन सुनिश्चित करण्यासाठी ट्रान्समिशन कॉरिडॉर उभारणीवर विशेष भर देण्यात येत असून टीबीसीबी पद्धतीद्वारे १६ हजार कोटी रुपयांची कामे सुरू झाली आहेत. पुढील तीन वर्षांत ट्रान्समिशन क्षेत्रात सुमारे ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

दरम्यान, पीएम सूर्य घर योजनेंतर्गत रूफटॉप सौर ऊर्जा निर्मितीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर पोहोचला असून गृहसंकुलांनी मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा स्वीकारल्यास त्यांच्या सामाईक वीज खर्चात मोठी बचत होऊ शकते, असंही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं आहे.

## खापरखेडा परिसरावर अंधाराचे सावट उमटणार !

### महापारेषणच्या ढिसाळ कारभारामुळे अनेक गावे संकटात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** ५०० मेगावॅट खापरखेडा औष्णिक वीज केंद्राला लागूनच असलेल्या महापारेषण कंपनीच्या ४०० KV CGR उपकेंद्रातील तब्बल २५ MVA क्षमतेचा मुख्य पॉवर ट्रान्सफॉर्मर गेल्या २२ जूनच्या सकाळपासून अचानक निकामी झाला आहे. त्यामुळे रोहणा, चनकापूर, सिल्लेवाडा, खापरखेडा, पिपळा (डाकबंगला), पाटणसावंगी व इतर परिसरातील गावांमधील वीज पुरवठा पूर्णपणे कोलमडला आहे. ऐन पावसाळ्याच्या दिवसांत निर्माण झालेल्या या वीज संकटामूळे सर्व सामान्य नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ट्रान्सफॉर्मर जळाल्याची माहिती मिळताच महावितरण कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवत इतर वाहिन्यांवरून (बॅकफीड) वीज पुरवठा सुरू केला व तात्पुरता दिलासा दिला. मात्र, हा पर्यायी वीज पुरवठा किती वेळ तग धरू शकेल याबाबत शंका आहे. कारण मुख्य ट्रान्सफॉर्मर बदलल्याशिवाय हा दाब कायम ठेवणे कठीण आहे. एकीकडे महावितरण कंपनी परिस्थिती सांभाळण्यासाठी धडपडत आहे तर दुसरीकडे मुख्य जबाबदारी असलेली महापारेषण कंपनी मात्र या गंभीर विषयावर 'मूग गिळून' बसली आहे. ट्रान्सफॉर्मर निकामी होऊन तीन दिवस उलटले आहे तरी महापारेषणकडून बदलण्याच्या हालचाली संथ गतीने सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.

२५ MVA चा ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलणे ही काळाची गरज आहे सध्याचा पर्यायी पुरवठा ओव्हरलोड झाल्यास संपूर्ण परिसर पुन्हा अंधारात बुडू शकतो महापारेषणने आपली सुस्त भूमिका सोडावी आणि तात्काळ नवा ट्रान्सफॉर्मर बसवावा अशी मागणी केल्या जात आहे.

महापारेषणच्या या उदासीन कारभारामुळे परिसरातील उद्योग, शेती आणि घरगुती ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. आधीच उष्णता आणि त्यात वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. महापारेषण कंपनीने तातडीने युद्धपातळीवर काम करून जळालेला ट्रान्सफॉर्मर न बदलल्यास, तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा परिसरातील संतप्त नागरिकांनी दिला आहे.

## आषाढी वारीपूर्वी पंढरपूर तालुका पोलिसांची धडाकेबाज कारवाई

### पुळूज येथून ३ लाख २५ हजारांची विदेशी दारू जप्त

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** आगामी आषाढी वारी व सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर तालुका पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात धडक मोहीम हाती घेतली आहे. दि. २३ जून २०२६ रोजी पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पुळूज या गावात पोलिसांनी मोठी कारवाई करत ३ लाख २५ हजार रुपये किमतीची विदेशी दारू जप्त केली आहे.

**२५ बॉक्स दारू जप्त !**

सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिसांनी पुळूज येथे रेड केली.

यावेळी आरोपी अन्सार शेख, वय ५० वर्षे, रा.पुळूज ता.पंढरपूर याच्या घराच्या बाजूला असलेल्या खोलीतून विविध कंपनीची विदेशी दारू साठवून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी रॉयल चॅलेंज, रॉयल स्टॅग, रोमॅनो अशा वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांचे एकूण २५ बॉक्स जप्त केले असून, जप्त करण्यात आलेल्या दारूची एकूण किंमत ३ लाख २५ हजार रुपये इतकी आहे.

**मुंबई दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा !**

आरोपी अन्सार शेख याच्याविरुद्ध मुंबई दारूबंदी अधिनियम कलम ६५ प्रमाणे पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आषाढी वारीच्या काळात अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

सदरची धडाकेबाज कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कवाडे, सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे



वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, PSI भारत भोसले, झडख निलेश गायकवाड, पोलीस हेडकॉन्स्टेबल दीपक भोसले, मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, संतोष चव्हाण, विजयकुमार आवटी, चालक पोलीस कॉन्स्टेबल महेश गोडसे व हासन नदाफ यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर अवैध धंद्यांवर पोलिसांनी करडी नजर ठेवली असून, अशीच कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा...



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** शेतकऱ्यांच्या शेतमाल वाहतुकीचा मार्ग सुकर व्हावा यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने अंतर्गत पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी ७ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

दि.२३ जून २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये या योजनेच्या अंमलबजावणीसाठी दि. ३० मे २०२६ रोजीचे शासन पत्र रद्द करण्यात आले असून, आता विधानसभा क्षेत्रनिहाय प्रशासकीय मान्यता देण्यासाठी निधीची सुधारित मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' नुसार पंढरपूर मतदारसंघासाठी ७.५० कोटींची मर्यादा निश्चित झाली आहे. उर्वरित मतदारसंघांची माहिती यथावकाश कळवण्यात येणार आहे. या शासन निर्णयानुसार क्षेत्रीय स्तरावर तातडीने खालील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत:

जोडलेल्या यादीप्रमाणे विधानसभा क्षेत्रनिहाय निधीच्या मर्यादेत रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता द्यावी. वेबपोर्टल व युनिक नंबर: योजनेच्या संनियंत्रणासाठी स्वतंत्र वेबपोर्टल सुरू करण्यात आले आहे. निश्चित केलेल्या शेत/पाणंद रस्त्यांना तात्काळ विशिष्ट क्रमांक (Unique Numbering) व प्रोजेक्ट आयडी (Project ID) निर्माण करावा. अंदाजपत्रक व कार्यादेश: प्रोजेक्ट आयडी निर्माण केलेल्या कामांचे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देऊन कार्यादेश देण्याची कार्यवाही करावी.

निधीची मागणी: संबंधित कंत्राटदारामार्फत शेत/पाणंद रस्त्यांचे ५० टक्के काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्यानंतरच सदर कामाकरिता निधीची मागणी शासनाकडे नोंदवावी. पूर्णत्वाचे प्रमाणपत्र: शेत/पाणंद रस्त्यांचे १०० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर, विहित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र (Work Completion Certificate) तात्काळ शासनास सादर करावे.

५०% काम झाल्याशिवाय निधी न देण्याच्या अटीमुळे कामांचा दर्जा व गती राखली जाणार आहे. तसेच वेबपोर्टलमुळे प्रत्येक कामाचे ऑनलाईन संनियंत्रण होणार असल्याने पारदर्शकता येईल. पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, लवकरात लवकर कामे सुरू व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**शेतकऱ्यांना मोठा दिलासा...**

पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी रस्ते नसल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होतात. ऊस, द्राक्ष, डाळिंब यांसारखा नाशवंत माल वेळेत बाजारात पोहोचवता येत नाही. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पक्के पाणंद रस्ते होतील व शेतमाल वाहतुकीचा खर्च व वेळ वाचेल, अशी प्रतिक्रिया आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

## २८ जूनच्या महामोर्चात संपूर्ण बहुजन समाजाचा सहभाग : रामदास कामडी

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२४, चिमूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघ तसेच एससी, एसटी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील समाजबांधवांच्या सहभागातून दि.२८ जून २०२६ रोजी भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे हा महामोर्चा काढण्यात येणार असून, यात ओबीसी, एससी, एसटी, एसबीसी, व्हीजेएनटी प्रवर्गातील विमुक्त व भटक्या जमातींचाही मोठ्या संख्येने सहभाग राहणार असल्याची माहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष रामदास कामडी यांनी दिली.

केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली देशभर जातनिहाय जनगणना करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी या महामोर्चातून करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने दि.१४ मे २०२६ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय बहुजन समाजाच्या हिताला बाधक व अन्यायकारक असल्याचा आरोप आयोजकांनी केला आहे. या निर्णयामुळे मागासवर्गीय उमेदवारांना शासकीय व निमशासकीय कार्यालये, संस्था, शिक्षण तसेच नोकरभरती प्रक्रियेत खुल्या प्रवर्गातील जागांसाठी पूर्वीप्रमाणे लाभ घेता येणार नसल्याने तो निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी महामोर्चातून करण्यात येणार आहे.

बहुजन समाजाशी संबंधित विविध प्रश्न आणि मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या महामोर्चात हजारो समाजबांधव सहभागी होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

महामोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष रामदास कामडी, भावना बावनकर, श्रीहरी सातपुते, प्रभाकर पिसे, रामभाऊ खडसिंगे, कवडू लोहकरे, ममता डुकरे, यामिनी कामडी, धर्मदास पानसे आदी पदाधिकाऱ्यांनी बहुजन समाजातील नागरिकांना केले आहे.

संपादकीय



## आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्व कळले

आज २५ जून, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ५१ वर्ष पूर्ण झाली. बरोबर ५१ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली.

राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता. या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली.

हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले.

पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ५० वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.

– श्याम ठाणेदार



## पावसाच्या सरी देई मनास उभारी

महाराष्ट्राबरोबर इतर काही राज्यांमध्ये साधारण ऋतुमानानुसार जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस पडतो. नक्षत्राचा विचार केल्यास मृग नक्षत्रापासून पावसाळ्याची चाहूल लागते. ढग दाटून यायला सुरुवात होते मात्र, त्या अगोदरचा काळ म्हणजे साधारण फ ेब्रुवारीपासून उन्हाळ्याची चाहूल लागलेली असते. महिन्यांपैकी साधारण मार्च ते मे हे तीन महिने उष्णतेच्या तीव्र दाहकतेने जीवाची लाहीलाही करून सोडतात. महाराष्ट्रातील काही भाग जसे की,विदर्भातील बुलढाणा ते नागपूर व खानदेशातील भुसावळ ते नंदुरबार या जिल्ह्याम ध्ये तर ४७ ते ४८ अंश डिग्री सेल्सिअस पर्यंत तापमान जाते. मात्र एवढ्या परिस्थितीतही लोक लग्नकार्य व इतर विधी करतात कारण या काळात शेतकरी वर्गांना शेतातील फारसे कामे राहत नाही. मात्र जूनच्या पहिल्या ते दुसऱ्या आठवड्यापासून पावसाची चाहूल लागते ढग दाटून यायला सुरुवात होते. उष्णतेची दाहकता कमी होते.या काळात माझा शेतकरी राजा पेरणीपूर्व मशागतीस सुरुवात करतो.

शेतकरी राजा तसं बघितलं तर चोवीस तास शेतकामात गुंतलेला असतो, कारण त्याला कडक उन्हाळ्यातही नांगरणी व पेरणीपूर्व मशागत करून ठेवावीच लागते. त्यासह त्याला गुरेढोरांसाठी सकाळ-संध्याकाळ त्यांच्या देखभालीसाठी जावेच लागते.अर्थात सकाळी उठल्यावर शेतात जाऊन गुरांचा गोठा साफ करणे, गाई-म्हशींचे दूध काढणे,त्यांचा चारापाणी करणे,काढलेले दूध गावालगतच्या तालुक्याच्या ठिकाणी डेअरीवर पोहोचवणे हे कार्य असतेच.याबरोबर काही शेतकऱ्यांच्या विहिरींना काही प्रमाणात पाणी असल्यास दैनंदिन खर्चासाठी काही शेतकरीवर्ग शेतात भाजीपाला पिकवतात तेव्हा कुठे आपल्यासारख्यांना दररोज जेवनात ताजा भाजीपाला मिळतो. जर शेतकऱ्यांनी शेतीच्या मूळ कामाव्यतिरिक्त पशुपालन व भाजीपाला संदर्भात पिके घेऊन व्यवसाय केला नाही तर आपल्याला दैनंदिन जीवन जगण्यास किती पंचायत निर्माण होईल याची वरील उदाहरणांवरून प्रचिती येते.अर्थात एवढ्या भर उन्हाळ्यातही शेतकरी ४७ ते ४८ अंश डिग्री सेल्सिअस तापमानात राब-राब राबत असतो. या उष्ण वातावरणाशी दोन हात करत गुराढोरांसाठी पाण्याची व्यवस्था, त्यांना चारापाणी याची व्यवस्था करता करता त्याच्या नाकी नऊ येते. तरी तो शेतीचे हे पवित्र कार्य अगदी आनंदाने करत असतो. कुठल्याही प्रकारची कुरकुर न करता संपूर्ण जगाचा गाडा ओढण्यासाठी सदैव तत्पर असतो.

शेतकरी राजाला आपल्या कुटुंबाच्या दैनंदिन गरजेबरोबर प्राणीमात्रांच्या सुद्धा चाऱ्या पाण्याची चिंता असते. त्याचबरोबर पेरणीपूर्व मशागतीसाठी लागणारा खर्च यामध्ये मुख्यत्वे नांगरणी,वखरणी,कुळवणी,तण व अवशेष काढणे,शेतात शेणखत/सेंद्रिय खत मिसळणे, जे पीक पेरायचे असेल जसे की मका, मिरची, सोयाबीन, ऊस,कपाशी यासाठी सरी-वरंबे तयार करणे चौफुली, वाफे तयार करणे, जमीन समतल करणे त्याचबरोबर बी- बियाणे खरेदी करणे,खते औषधी खरेदी करणे या सर्व वस्तूंची जुळवा जुळवा करावी लागते. उन्हाळ्यातील लग्नकार्यासाठी पाहुण्यांचा मानपानासाठी झालेला खर्च. हे सर्व सांभाळून कुटुंबात वृद्ध आई-वडील असल्यास त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे. नेमकं जून महिन्यात सुरू झालेल्या चिमुकल्यांच्या शालेय खर्च हे सर्व त्याच्या डोळ्यासमोर असताना शेतकरी राजा घरात हजारो रुपयांची पेरणीपूर्व पेरणीसाठी साहित्य आणून ठेवतो. स्वतःच्या खिशात पैसे शिल्लक नसल्यास पैशाची जुळवा जुळव करण्यासाठी बँकांकडून क्रॉप लोन,सोसायटींकडून कर्जाऊ रक्कम घेतो. स्वतःच्या व कुटुंबाच्या काही गरजा बाजूला ठेवतो.मात्र शेतीसाठी पेरणीचे सर्व साहित्य प्रथम खरेदी करतो, कारण त्याचे संपूर्ण भविष्य हे शेतीमालावर व पिकावर अवलंबून असते.उद्याचे स्वप्न तो शेतीच्या भरवशावर बघतो मात्र या एवढ्या आर्थिक विवंचनेतही जर पावसाचे वेळेवर आगमन झाले नाही तर मात्र आभाळाकडे केविलवाण्या नजरेने बघतो. नांगरून व पेरणीपूर्व मशागत केलेल्या काळ्याभोर जमीन माउलीकडे बघत व आभाळाकडे केविलवाण्या नजरेने बघत डोळ्यातून केव्हा अश्रू टपकतात हे कळतही नाही.जेव्हा पावसाच्या थेंबांची या काळ्या माउलीला गरज असते तेव्हा मात्र माझ्या शेतकरी राजाच्या डोळ्यातील अश्रूंनी काळी मायमाऊलींचं हृदय पिळवटून जाते.ती माऊली शेतकरी बाळाच्या कानात हळूच सांगते, मी आहे ना! आपला बाप काही काळापुरता कठोर जरी झाला तरी, तुझ्याविषयी त्याची माया तेवढीच आहे. बाळ ! मुळात पाऊस बाप कठोर नाही रे! या बदलत्या काळात या पृथ्वीच्या झालेला नाश,वृक्षतोड, पर्यावरणाने झालेला असमतोल,सिमेंटची जंगले,मोठमोठी कारखाने, जल वायू व भू प्रदूषण यामुळे तो काहीसा नाराज आहे.त्याचा येण्याचा काळात किंचित बदल झाला आहे.त्याची बरसण्याची रूपरेषा बदललेली आहे.याचा अर्थ तो आपल्याकडे पाठ फिरवेल असे नाही.त्याचे तुझ्यावर खूप प्रेम आहे. बाळ ! तू त्याचा सर्वात लाडका आहेस, कारण तू जगाचा पोशिंदा आहेस. तू जगाच्या प्रत्येक जीवाच्या मुखी घास घालतोस, म्हणून काळजी करू नकोस. वरून राजा,सर्वांचा बाप- पाऊस त्याच्या सरींनी धो-धो बरसेल आणि चहूकडे चैतन्याचे वातावरण निर्माण करेल.तेव्हा तू खुशाल पेरणी कर.भरघोस पीक घे.उत्पन्न घे. सर्वांच्या मुखी सुखाचा घास घाल. काळ्या आईच्या या मातृहृदयाची हाक ऐकून, वरून राजाची चाहूल लागली असता,काळेभोर ढगे दाटून लागल्यावर व विजा थयथय नाचू लागल्यावर शेतकरी दादाच्या मनाला या पावसाच्या सरी बघून उभारी येते व तो नव्या जोमाने पेरणीला सुरुवात करतो.

**श्री. विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

## पांडुरंगाच्या मूर्तीच्या रासायनिक लेपनास अखेर न्यायालयाची स्थगिती !

कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथील श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या मूर्तीवर पुरातत्व विभागाद्वारे २३ आणि २४ जून या दिवशी रासायनिक वज्रलेपन करण्यात येणार होते. यास वारकरी संघटनांसह विविध हिंदुत्ववादी संघटनांनी कडाडून विरोध केला होता. वारकरी संघटना, मंदिर महासंघ, तसेच महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. पुरुषोत्तम (गणेश) लंके आणि बाळकृष्ण डिंगरे यांनी पंढरपूर येथील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्रीमती सोनाली राऊळ यांच्या न्यायालयात रासायनिक वज्रलेपनाच्या विरोधात दावा प्रविष्ट केला होता. या प्रकरणी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून न्यायालयाने पुढील आदेश मिळेपर्यंत कोणत्याही प्रकारचे लेपन करण्यास स्थगिती दिली आहे. न्यायालयाच्या या आदेशाबद्दल समस्त वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

आतापर्यंत मंदिर समितीने ४ वेळा रासायनिक लेपन केले आणि त्यातील फोलपणा लक्षात येऊनही मंदिरे समिती आणि पुरातत्व विभाग रासायनिक लेपनावर ठाम होता. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे मूर्तीमध्ये प्राण असतात आणि 'प्रत्यक्ष देव तिथे आहे, मूर्तीमध्ये देवत्व आहे', असे समजूनच भाविकांकडून सर्व कृती केल्या जातात. यात काकड आरती, शेजारतीपासून ते नैवेद्यापर्यंतच कृतींचा समावेश असतो. त्यामुळे मंदिरे



समिती रासायनिक लेपन करतांना केवळ दगडाची मूर्ती समजून रासायनिक लेपनाची कृती करत आहे ती चुकीची आहे. मूर्तीला जर अपवित्र वस्तूंचा स्पर्श झाल्यास मूर्तीचे देवत्व नष्ट होते याविषयी अधिवक्ता सुधीर रानडे यांनी न्यायालयात वारकऱ्यांची बाजू मांडली . या प्रसंगी म हाकालेश्वर मंदिर प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्दे शांचाही आधार देण्यात आला. यात भक्तांच्या धार्मिक भावना दुखावणारे निर्णय घेता येणार नाहीत, असे सर्वो च्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयात करवीर पीठाच्या शंकराचार्यांचे पत्र सादर करण्यात आले. ज्यात त्यांनी रासायनिक लेपनास स्पष्ट विरोध केल्याचे नमूद केले आहे. याचीही नोंद न्यायालयाने घेतल्याचे पत्रकारांशी संवाद साधताना अधिवक्ता सुधीर रानडे यांनी स्पष्ट केले. केवळ एवढ्यावरच न थांबता मूर्ती संवर्धनासाठी आयुर्वे दिक वज्रलेप हा अधिक सुरक्षित आणि परंपरेस अनुरूप असल्याचे न्यायालयात सांगण्यात आले. याविषयी प्रसिद्धीपत्रकाद्वारे भूमिका मांडतांना महाराष्ट्र मंदिर म हासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले की, तब्बल २८ युगे विटेवर सुखरूप उभा असणार्या पांडुरंगाच्या मूर्तीच्या पायाला कोरोना महामारीच्या काळात खड्डा कसा पडला ? आणि श्री रुक्मिणीमातेचे पाय का खराब झाले ? याचे कोणतेही शास्त्रीय उत्तर अद्याप मंदिरे समिती किंवा पुरातत्व विभाग यांना देता आलेले नाही.रासायनिक लेपनाच्या संदर्भात जिल्हाधिकार्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत केवळ मते नोंदवली गेली; मात्र कोणती रसायने वापरणार ? आणि संवर्धन कसे करणार ? याची कोणतीही स्पष्ट माहिती प्रशासनाने दिली नाही. अचानक पत्रक काढून मंदिर बंद ठेवत वज्रलेपाचा निर्णय घोषित केल्याने भाविकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला. मूर्ती संवर्धनासाठी 'आयुर्वेदिक वज्रलेप' हा अधिक सुरक्षित आणि परंपरेस अनुरूप असल्याचे न्यायालयात सप्रमाण म ांडले आहे. यापुढील काळात तरी मंदिर समिती वारकरी, धर्माचार्य, संत-महंत आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या भावनांचा आदर करील, अशी आम्हाला आशा आहे. शेकडो वर्षांपासून नियमित अभिषेक आणि पूजा होत असलेली अनेक मंदिरे महाराष्ट्रात आहेत. त्यांतील पुरातन मुर्त्यांची झीज होत असल्याचे जेव्हा जेव्हा निदर्शनास येते तेव्हा पुरातत्व विभागाकडून आणि सरकारकाकडून केवळ रासायनिक वज्रलेपन प्रक्रिया करण्याचे उपाय योजले जातात. ही रासायनिक लेपन प्रक्रिया कुचकामी आणि धर्मशास्त्रविसंगत तर आहेच शिवाय यापासून मूळ मूर्तीचीही हानी होते त्यामुळे या लेपनाला भक्त मंडळींकडून आणि जाणकारांकडून नेहमीच विरोध होत असतो. पुरातन मंदिरांतील देवतांच्या मुर्त्या ह्या केवळ मुर्त्या नसतात तर लाखो करोडो भाविकांची ती श्रद्धास्थाने असतात. त्या ठिकाणी साक्षात देवता आहेत आणि त्या जागृत आहेत. भक्तांनी देवतांच्या चरणी घातलेले साकडे भगवंत ऐकतो आणि भक्तांची मनोकामना तो पूर्णही करतो. संकटसमयी भक्तांच्या पाठीशी उभा राहतो, जीवनातील कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याचे बळ देतो. त्यामुळे अशा देवतेवर रासायनिक लेपन करण्याची प्रक्रिया अत्यंत अयोग्य आहे. पुरातत्व विभाग भक्तांच्या भावनांचा विचार केव्हा करणार ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## संकल्प संस्थेच्या पॅरा कौन्सिलिंग कोर्सचा उत्साहात शुभारंभ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, मुंबई :** संकल्प संस्था आयोजित पॅरा कौन्सिलिंग कोर्सचा उद्घाटन समारंभ रविवारी नेहरू नगर, कुर्ला (पूर्व) येथील शांताराम कृष्णाजी पंत वालावलकर माध्यमिक विद्यालय (न्यू इंग्लिश स्कूल) येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

सविता हेंडवे व वनिता सावंत यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनिता सावंत यांनी केले, उपस्थित मान्यवरांची ओळख प्रदीप रणदिवे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सविता हेंडवे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे मानसिक, कौटुंबिक व सामाजिक समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे सांगितले. अशा परिस्थितीत प्रशिक्षित समुपदेशकांची गरज मोठ्या प्रमाणात निर्माण झाली असून समाजात संवेदनशील, जबाबदार व समाजाभिमुख समुपदेशक घडविण्याच्या उद्देशाने संकल्प संस्थेने पॅरा कौन्सिलिंग कोर्स सुरू केल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रशिक्षणाद्वारे सहभागी व्यक्तींना समुपदेशनाचे मूलभूत ज्ञान, कौशल्ये आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव विकसित होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून संकल्प संस्थेचे संस्थापक -अध्यक्ष विनोद हिवाळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आपल्या भाषणात त्यांनी संकल्प संस्थेच्या स्थापनेपासून गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, युवक विकास, व्यसनमुक्ती, समुदाय विकास आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांत सुरू असलेल्या कार्याचा आढावा घेतला. समाजात काम करताना अनेक व्यक्ती मानसिक तणाव, कौटुंबिक संघर्ष, व्यसनाधीनता, नैराश्य, बालक व किशोरवयीन समस्या यांचा सामना करत असल्याचे अनुभवातून स्पष्ट झाले.

या समस्यांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशकांची मोठी गरज असल्याचे लक्षात घेऊन संकल्प संस्थेने पॅरा कौन्सिलिंग कोर्स सुरू करण्याचा



निर्णय घेतला. समाजामध्ये संवेदनशील, प्रशिक्षित आणि जबाबदार समुपदेशकांची फळी तयार करणे हा या प्रशिक्षणामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या उद्घाटन समारंभास मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्थेच्या उपसंचालक मा. ज्ञानेश्वरी सोनावणे, बाल कल्याण समिती मुंबई उपनगरचे अध्यक्ष अॅड. महेश घाटगे, मॉडेल व सिने-नाट्य अभिनेत्री मा. स्मिता धुमाळ, महाराष्ट्र राज्य नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षाताई विद्या विलास तसेच वर्षा सोनावणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून पॅरा कौन्सिलिंग कोर्सचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत मानसिक आरोग्य, कौटुंबिक प्रश्न, व्यसनमुक्ती, बालक व किशोरवयीन समस्या तसेच विविध सामाजिक आव्हानांवर प्रभावीपणे काम करण्यासाठी प्रशिक्षित समुपदेशकांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजात संवेदनशील, जबाबदार आणि प्रशिक्षित समुपदेशक घडविण्याच्या दृष्टीने संकल्प संस्थेचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे मत व्यक्त करत समुपदेशन क्षेत्रातील अनुभव कथन करत प्रशिक्षणार्थींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आणि सर्व प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात वर्षाताई विद्या विलास यांनी प्रेरणादायी गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच प्रशिक्षणार्थी अशोक दात्रे यांनी सामाजिक विषयावरील गीत सादर करून कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्नेहा कासारे, प्रवीण रुपवते, रेणुका सिंह, अश्विनी घुमरे, सोनाली कांबळे, सुप्रभा गायकवाड, अविनाश पाटील आणि सूर्यकांत चव्हाण यांचे विशेष सहकार्य लाभले.

शेवटी दीपा गमरे यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थित मान्यवर, प्रशिक्षणार्थी व सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमास प्रशिक्षणार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

# थोडक्यात

## निराधारांचे रखडलेले अनुदान तात्काळ द्या; अन्यथा १७ जुलैला 'भीक मागो' व सामूहिक मुंडन आंदोलनाचा इशारा




**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२४, चिमूर (चंद्रपूर) :** चिमूर तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ पेन्शन योजना, विधवा अनुदान योजना, अपंग अनुदान योजना आदी सामाजिक सुरक्षा योजनांतील अनेक लाभार्थ्यांचे अनुदान अनेक म हिन्यांपासून रखडल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर शंकरपूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार चिमूर यांना निवेदन देऊन तात्काळ अनुदान वितरित करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाकडून मिळणारे हे अनुदानच अनेक निराधार, वृद्ध, अपंग व विधवा लाभार्थ्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. मात्र अनेक महिन्यांपासून अनुदान जमा न झाल्याने लाभार्थ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. औषधोपचार, अन्नधान्य, वीजबिल तसेच दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्यांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. १५ जुलै २०२६ पर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात रखडलेले अनुदान जमा करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा १७ जुलै २०२६ रोजी तहसील कार्यालय चिमूर येथे 'भीक मागो आंदोलन' करण्यात येईल. त्यानंतर शासनाच्या निष्क्रियतेच्या निषेधार्थ सामूहिक मुंडन आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदन देताना शंकरपूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक चौधरी, साठगाव ग्राम पंचायतीच्या उपसरपंच प्रीती दिडमुटे तसेच विविध योजनांतील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी रखडलेल्या अनुदानाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तात्काळ निधी वितरित करण्याची मागणी केली.

## बनचिंचोली येथे बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक; शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील मौजे बनचिंचोली येथे कृषी विभागाकडून शेतकऱ्यांसाठी बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन कार्यक्रमा आयोजित करण्यात आला होता. कृषी सहाय्यक यकुलवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन तसेच सेंद्रिय किडनयंत्रणाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात शेतकऱ्यांनी बियाण्याचे प्रक्रिया कशी करावी, पेरणीपूर्वक काळजी कशी घ्यावी याची प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. तसेच पीक पेरणी करताना रुंद वरंबा पद्धतीचा अवलंब करण्याचा सल्ला दिला. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता लक्षात घेता हुमनी प्रादुर्भाव होऊ शकतो, त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतात प्रकाश सापळे लावून किड नियंत्रण करावे, असे आवाहन करण्यात आले. पाणी फाउंडेशनच्या वतीने दशपर्णी अर्क निर्मिती बाबतही मार्गदर्शन करण्यात आले. मिर्ची, लसूण, गोमूत्र, गायीचे शेण, करंजी, निरगुडी, धोत्रा, लिंब, सीताफळ, गुळवेल, एरंडेल आदी वनस्पतींचा वापर करून तयार करण्यात येणारा दशपर्णी अर्क पिकांवरील किडींच्या नियंत्रणासाठी प्रभावी ठरतो, अशी माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमास कृषिसहायकासह इतर अधिकारी व गावातील नागरिक उपस्थित होते.

## देवाडा बुज येथील राजकारणातील अष्टपैलू कार्यकर्ता हरपला, गावात शोककळा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, पोभुर्णा (चंद्रपूर) :** तालुक्यातील देवाडा बुजरुक येथील राजकीय सामाजिक दृष्ट्या व्यक्तिमत्व असलेले राजकारणातील अष्टपैलू कार्यकर्ता माजी उपसरपंच श्यामसुंदर श्रीराम बदन यांचें दुःखद निधन दिनांक २३ जून २०२६ रोज मंगळवारी ठिक २ वाजता झाल्याने गावात शोककळा पसरली होती. राजकारणातील निष्ठावंत ग्राम पंचायत निवडणुकीत नेहमी उत्सुक राहुन निवडनुक मोठ्या उमेदीने लढण्यासाठी गावच्या कार्यकत्यांना प्रोत्साहित करणारे माजी उपसरपंच श्यामसुंदर श्रीराम बदन हे जगाच्या पडद्याआड झाल्याने गावात शोकसंदेश व्यक्त करण्यात आले. त्यांच्या पार्थिव देहावर वैनगंगा नदी घाटावर बुधवारला अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी मुली नातवंडे जावंई असा मोठा आप्त परिवार आहे.

## कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई संस्थेच्या वतीने ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२४, परळ (मुंबई) :** कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई संस्थेची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १२ जुलै २०२६ रोजी, सायंकाळी ०४ वाजता, कुणबी समाजोन्नती संघ (वाघे हॉल) सेंट झेवीयर स्ट्रीट, परळ मुंबई-४०००१२ येथे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सुरेश ऐनारकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली असून सभेपुढील विषय - १) दि. १३ जुलै २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन करुन त्यास मान्यता देणे. २) दि. ३१ मार्च २०२६ अखेरच्या वार्षिक अहवालाचे वाचन व मंजुरी करणे तसेच वार्षिक आर्थिक अहवाल / लेखापरीक्षण अहवाल सादर करुन त्यास मान्यता देणे ३) सन २०२६-२०२७ या वर्षासाठी लेखा परिक्षकाची नियुक्ती करणे ४) संस्थेच्या चालू व आगामी उपक्रमांवर चर्चा करणे ५) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय. याप्रमाणे कामकाज व सभेपुढील विषय असल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. त्याचबरोबर प्रसिद्धी पत्रकातून महत्वपूर्ण सूचना करण्यात आली आहे की चिट्टी मालकास सभेस हजर राहता आले नाही तर आपला प्रतिनिधी पाठवावा तसेच गणसंख्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने चालू करण्यात येईल त्यावेळी गणसंख्येची अट लागू होणार नाही अशी नोंद सूचना करण्यात आली आहे. सदर सभेला चिट्टी मालक / सभासद यांनी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन उपरोक्त संस्थेचे सरचिटणीस संतोष धारशे यांनी केले आहे.

## लोखंडी केबिनमध्ये 'वसुली' सुरू असल्याचा आरोप; प्रशासन झोपेत आहे का?




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, शिळफाटा (ठाणे) :** शिळ-महापे रोडसह शिळफाटा ते दहिसर आणि शिळफाटा ते देसाई या महत्त्वाच्या मार्गांवर दररोज भीषण वाहतूक कोंडी होत असून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. वाहनांच्या लांबच लांब रांगा, कंटेनर-ट्रकची गर्दी आणि १५ मिनिटांच्या अंतरासाठी २ तासांचा वेळ लागत असल्याने नोकरदार वर्ग व व्यावसायिक संतप्त झाले आहेत.

**सर्वच मार्गांवर सेम परिस्थिती**

केवळ शिळ-महापे रोडच नाही, तर शिळफाटा ते दहिसर आणि शिळफाटा ते देसाई नाका या मार्गांवरही रोजचीच ही कोंडी झाली आहे. पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली असून, संपूर्ण शिळफाटा परिसर वाहतूक कोंडीने जाम झाला आहे.

**अधिकारी पेपर चेकिंगमध्ये, रस्ता जाम**

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वाहतूक अधिकारी एका बाजूला ८-१० जण उभे राहून केवळ कागदपत्रे तपासण्यात व्यस्त असतात. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतूक ठप्प होते. रोड टॅक्स भरूनही मोकळे रस्ते मिळत नाहीत, तर असे अधिकारी काय कामाचे? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

**लोखंडी केबिनमध्ये 'वसुली'चा आरोप**

याचवेळी वाहतूक विभागाने रस्त्यावर उभारलेल्या खासगी लोखंडी केबिनमध्ये वाहन चालकांकडून पैसे उकळले जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. कागदपत्रे व्यवस्थित नसल्यास 'एकतर दंड भरा नाहीतर तोडपाणी करा' अशी उघडपणे विचारणा केली जाते, असा दावा वाहनचालकांनी केला आहे.

**कायमस्वरूपी तोडग्याची मागणी**

शिळफाटा परिसरातील या तिन्हीही प्रमुख मार्गांवर रोज होणाऱ्या कोंडीम ुळे नागरिकांचे आर्थिक व मानसिक नुकसान होत आहे. प्रशासनाने या 'वसुली'च्या आरोपांची चौकशी करून वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## जरंडी शिवारात ढगफुटी सदृश पाऊस

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२४, सोयगाव (छ. संभाजीनगर) :** जरंडी सह परिसरात बुधवार, दिनांक २४ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजेपासून सुरु झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने जरंडी शिवारात हाहाकार उडाला होता. दरम्यान गावालगत असलेल्या जरंडीच्या खडकी नदीला सकाळी ११ वाजता पूर आल्याने पुराच्या तडाख्याने सोयगाव-चाळीसगाव राज्य मार्गावरील पूल वाहून गेला ५ तासापासून सुरू असलेल्या जरंडीच्या खडकी नदीच्या पुराने सोयगाव - बनोटी - चाळीसगाव मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. तर गावाबाहेरील याच याच रस्त्यावरील पूल वाहून गेल्यामुळे सोयगाव-चाळीसगाव-बनोटी-पाचोरा संपर्क तुटला आहे.

दरम्यान ग्रामपंचायतीने या रस्त्यावरील रहदारी ठप्प असल्याचा सूचना दिल्या आहेत जरंडी परिसरात दिनांक २४ जून रोजी झालेल्या २ तासांच्या ढगफुटी सदृश पावसाने नव्याने दुतर्फा रस्त्याचे सिमेंट करणं सुरू आहे. परंतु या रस्ता च्या संबंधित ठेकेदाराने रस्त्यावरील नाल्यांचे पाणी आणि वळण रस्ते पक्के न केल्याने जरंडी ते सोयगाव या रस्त्या दरम्यान वळण रस्तेही वाहून गेले आहे. दरम्यान जरंडी च्या खडकी नदीला पहिलाच पूर आला असून या पुराने ५ तास वाहतूक ठप्प झाली होती. मात्र तालुक्यात इतर भागात मध्यम पाऊस झाला आहे.



**शेतात पाणीच पाणी पिकांचे नुकसान**

दरम्यान जरंडी शिवारात झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने नुकत्याच जमि नी बाहेर आलेल्या कोवळ्या अंकुरांना पाण्याने वेढा घातला आहे.

त्यामुळे कोवळी पिके पाण्यात बुडाली असून, काही शेती शिवारात नुकतीच दिनांक २३ जून लागवड झालेल्या क्षेत्रात पाणीच पाणी साचले आहे, तर शेती बंधारे फुटून शेती वाहून गेल्याच्या प्रकार जरंडी शिवारात झाला आहे. त्यामुळे शेती पिकांसह शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

## केरा नदीत केला कचरा डेपो; नाक मुठीत धरून पाटणमध्ये प्रवेश

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२१, पाटण (सातारा) :** पाटण केरा पुलाजवळ केरा नदीत अक्षरशः कचरा डेपो केला आहे. त्यामुळे केरा पुलावरून ये जा करताना नागरिकांना नाक मुट्टीत धरून पाटणमध्ये प्रवेश करावा लागत आहे.

पाटण नगरपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याने चिकन मटण मासे निघालेली वेस्टेज घाण केरा, पुला शेजारी थेट केरा नदीमध्ये कचरा टाकल्यामुळे मोठी दुर्गंधी परिसरात पसरली आहे.

या दुर्गंधीचा केरा पुलावरून ये जा करणाऱ्या नागरिकांना व परिसरातील नागरिकांना मोठा आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. पाटण नगरपंचायतीच्या नाकर्ते पणामुळे हा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे येथे कचरा टाकणाऱ्यांच्यावर कडक कारवाई केली तर कचरा टाकायचे कोणी धाडस करणार नाही. तर पाटण शहरातून वाहणाऱ्या केरा नदीचे पात्र दिवसेंदिवस प्रदूषणाच्या विळख्यात सापडत असून, आता या नदीचे रूपांतर अक्षरशः कचरा डेपो झाली आहे, नदीपात्रात काही चिकन मटण व मासे दुकानांमधील टाकाऊ अवशेष, पिसे, आतडी तसेच इतर घाण सर्रास टाकली जात असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या दुर्गंधीमुळे नदीलगतच्या नागरिकांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले असून येथून ये-जा करताना नाक मुठीत धरावे लागत आहे. सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पाटण नगरपंचायतीकडून घाण टाकणाऱ्यांवर कसलीच कारवाई होताना दिसत नाही. स्वच्छ, सुंदर पाटण शहराचा नारा देणाऱ्या पाटण नगरपंचायत प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

पाटण शहरातील काही मांस विक्रेते आणि असामाजिक प्रवृत्तीचे लोक नियमांचे उल्लान करत रात्रीच्या वेळी किंवा पहाटे नदीपात्रात चिकन मटणचा व माशाचा कचरा टाकत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. या कचऱ्यामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणात घाण साचून राहते. हा कचरा कुजत असल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे नागरिकांना नाक दाबून प्रवास करावा लागत आहे.

या घाणीमुळे माशा, डास, उंदिर आणि भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. कचऱ्यावर ताव मारण्यासाठी कुत्र्यांचे कळप नदीपात्रात फिरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. हा सर्व कचरा वाहून जाऊन पाण्याचे प्रदूषण वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीतील जलचरांवरही परिणाम होऊ शकतो, अशी भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

केरा नदी ही शहराच्या पर्यावरणाचा महत्त्वाचा भाग असताना तिची होत असलेली दुर्दशा चिंताजनक आहे. नदी स्वच्छ ठेवण्यासाठी वेळोवेळी विविध अभियान राबविण्यात येतात, मात्र नदीपात्रात कचरा टाकणाऱ्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने ही मोहीम केवळ कागदोपत्रीच राहिल्याचे दिसून येत आहे.



पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार नदी, नाले किंवा सार्वजनिक ठिकाणी जैविक कचरा टाकणे हा गंभीर प्रकार मानला जातो. असे असतानाही संबंधित विभागाकडून प्रभावी देखरेख होत नसल्याने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे धाडस वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

-----------------------------------

केरा नदीचे वाढते प्रदूषण ही केवळ स्वच्छतेची समस्या नसून पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्याशी निगडित गंभीर बाब आहे. प्रशासनाने वेळीच कठोर पावले उचलली नाहीत तर नदीचे अस्तित्व आणि परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे

## घे भरारी फाऊंडेशनकडून २०० गरजू लाभार्थ्यांना सायकलींचे वाटप

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२४, डहाणू (पालघर) :** घे भरारी फाऊंडेशनच्या माध्यमातून कासा, चारोटी तसेच डहाणू तालुक्यातील गरजू नागरिक, महिला, कामगार आणि शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी राबविण्यात आलेल्या सायकल वितरण उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमांतर्गत बुधवार, दिनांक २४ जून २०२६ रोजी आणखी २०० गरजू लाभार्थ्यांना सायकलींचे यशस्वी वितरण करण्यात आले. शिक्षण, स्वावलंबन आणि दैनंदिन प्रवास सुलभ व्हावा या उद्देशाने घे भरारी फाऊंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील गरजू घटकांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या या सायकल योजनेमुळे अनेक विद्यार्थी, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

या समाजहिताच्या कार्यामागे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पालघर जिल्हाध्यक्ष आनंदभाई ठाकूर यांची जनकल्याणाची दूरदृष्टी, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि प्रेरणादायी कार्यपद्धती हेच प्रमुख प्रेरणास्थान राहिले आहे. त्यांच्या सामाजिक कार्यातून प्रेरणा घेत समाजातील वंचित आणि गरजू घटकांसाठी सातत्याने काम करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या उपक्रमाला यशस्वी स्वरूप प्राप्त करून देण्यात घे भरारी फाऊंडेशनच्या अध्यक्षा कविता संखे यांचे विशेष योगदान लाभले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आणि अथक प्रयत्नांमुळे हा उपक्रम अधिकाधिक गरजूं पर्यंत पोहोचत आहे. तसेच संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणी प्रभावीपणे पार पाडण्यासाठी डॉ.योगेश सुभाष बन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उपाध्यक्ष पालघर जिल्हा यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या समन्वयामुळे आणि नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्णत्वास जाऊ शकला.

# कोराडी देवी मंदिर रोडवरील अपघातातील आरोपी जंगन्नाथ प्रसादवर कडक कारवाई करा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** दुचाकी चालकाच्या निष्काळजी पणामुळे घडलेल्या भीषण अपघातात श्रीमती जिजाबाई गौरखेडे यांचा दुर्दैवी मृत्यू १८ जून रोजी पहाटेच्या सुमारास झाला. या घटनेतील मुख्य आरोपी जंगन्नाथ प्रसाद हा घटनास्थळावरून पसार झाला होता. खापरखेडा पोलिसांनी घटनेतील आरोपी जगन्नाथ प्रसाद याच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०६(२) अंतर्गत तात्काळ गुन्हा दाखल आहे. माणुसकी वेशीवर टांगणाऱ्या आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं) चे नेते पृथ्वीराज बागडे यांनी केली आहे.

१८ जून रोजी सकाळी पहाटेच्या सुमारास कोराडी देवी मंदिर रोडवरील 'ए. पी. बार' समोर हा अपघात घडला. यावेळी आरोपी जंगन्नाथ प्रसाद याने आपली दुचाकी निष्काळजीपणे चालवत जिजाबाई गौरखेडे यांना मागून जबर धडक दिली होती. सदर घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली

या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी अनेक पदाधिकारी आणि ग्रामस्थ पुढे आले आहेत. ठाणेदार यांना निवेदन देतेवेळी चिंचोली (खापरखेडा) ग्राम पंचायतच्या सरपंच मिनाक्षी तागडे, ग्राम पंचायत सदस्य धीरज देशभ्रतार, माजी ग्रामपंचायत सदस्या लताताई डोंगरे, प्रभाबाई तागडे, बौद्ध महिला मंडळाच्या अध्यक्षा सुनंदा लोखंडे, सचिव किरण शेंडे, अंतकला गाडेकर, मैनाबाई सोमकुवर, प्रभाबाई गायकवाड, पूनम गणवीर, राजेंद्र मेश्राम, मनोहर डोंगरे, नरेश पाणतावणे, निशांत गेडाम, योगेश चोरपागार, यश देशभ्रतार, अभिषेक शेंडे, मोहित राऊत आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

अपघात घडल्यानंतर माणुसकीला काळीमा फासत जखमी महिलेला मदत करण्याऐवजी आरोपी जंगन्नाथ प्रसाद घटनास्थळावरून पळून गेला.

दुर्दैवाने वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे जिजाबाईंचा मृत्यू झाला. हा निव्वळ अपघात नसून आरोपीची गुन्हेगारी मानसिकता दर्शवणारी घटना आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपीला कठोर शिक्षा करावी आणि पीडित कुटुंबाला न्याय द्यावा.

**- पृथ्वीराज बागडे**
**(नेते, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया)**



## रिपाइं नेते पृथ्वीराज बागडे यांची मागणी...

# धनोजे कुणबी समाज मंदिरात जागतिक योगदिन साजरा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त धनोजे कुणबी समाज मंदिरात उत्साहपूर्ण वातावरणात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रम ला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमासाठी योगगुरू म्हणून भावना सराफ, सचिन चौधरी आणि संजय सराफ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या प्रारंभी धनोजे कुणबी मंडळाचे अध्यक्ष श्रीधर मालेकर, सचिव अतुल देऊळकर आणि डॉ. प्रभाताई वासाडे यांच्या हस्ते योगगुरूंचे पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.

महिला समितीच्या अध्यक्ष संध्या गोहोकार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. गुरूस्तवनाच्या सुरेल सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर योगगुरूंनी योगाचे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व विशद करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक करून सहभागींकडून त्याचा सराव करून घेतला.



यावेळी श्री रविशंकर गुरुजी यांच्या आवाजातील ध्यानसाधनेचे प्रात्यक्षिकही घेण्यात आले. ध्यानामुळे मनःशांती, एकाग्रता आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते, असे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. प्रभाताई वासाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. योग, प्राणायाम आणि ध्यान यांच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाची उत्साहपूर्ण व चैतन्यमय वातावरणात सांगता झाली. उपस्थितांनी नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी समाज मंडळाचे कोषाध्यक्ष सुधाकर काकडे, सदस्य संजय वैद्य, महिला सदस्य तथा नगरसेविका मनीषा बोबडे, नगरसेवक अजय बलकी, अशोक उपरे, संतोष कुचनकर, देवराव सोनपितरे, रंजित डवरे, रेखा सर्जेकर, नीता पावडे, वीणा उमरे, शोभा देऊळकर, सुचिता देऊळकर, किरण मोरे, कल्पना हिंगाणे आदी गणमान्य समाज बांधव, महिला भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# 'व्यसनमुक्त भारत, समृद्ध भारत' चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** अमली पदार्थांच्या वाढत्या दुष्परिणामांबद्दल शालेय विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी पोलीस आयुक्तालय नागपूर शहर, खापरखेडा केंद्र व जि.प.उच्च प्राथमिक शाळा चनकापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत दिनांक २४ जून २०२६ रोजी जि.प.उच्च प्राथमिक शाळा चनकापूर येथे व्यसनमुक्त भारत समृद्ध भारत या विषयावर भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत खापरखेडा केंद्रातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

याप्रसंगी खापरखेडा पोलीस ठाण्याचे पूर्व ठाणेदार व सेवानिवृत्त पोलीस उपविभागीय अधिकारी गजानन एमपल्लीवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरीश रुमकर, सावनेर पंचायत समिती माजी उपसभापती राहुल तिवारी, सुनील जालंदर, कपिल वानखेडे, केशव पानतावणे, राजेश खंडारे, श्रीकांत जालंदर, संजय गोठवाड, मुख्याध्यापक अनिल भेदे, केंद्र प्रमुख दीपक शेंडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र विद्यालय, शंकरराव चव्हाण विद्यालय, जि.प.उच्च प्राथमिक शाळा चनकापूर, हसनुर कॉन्व्हेंट, सिक्रेट हार्ट, ईरा कॉन्व्हेंट, आदी शाळेतील विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत सहभाग नोंदविला. स्पर्धेत प्रथम क्रमांक धनश्री कावळे, द्वितीय क्रमांक उज्वला भड, तृतीय क्रमांक रोशनी केसकर यांना देण्यात आला तर सौम्या मोरे,




काजल कुरील, साफिया सलमानी, दिव्यांशी बोन्डे, अंतिमा सूर्यवंशी यांना प्रोत्साहनपर परितोषक देण्यात आले. विजयी विद्यार्थ्यांना स्कुल बॅग व वाटर बॉटल देण्यात आली. यावेळी गजानन यमपल्लीवर यांचा खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. तरुण पिढीला व्यसनाधीनतेपासून दूर ठेवण्यासाठी अशा मोहिम राबविने गरजेचे आहे, विद्यार्थ्यांनी चित्रांच्या माध्यमातून दिलेला संदेश समाजाला अंतर्मुख करणारा आहे असे मत सत्कारमूर्ती गजानन यमपल्लीवर यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशुतोष चौधरी, इंदिरा लांबट, पूजा डूंबरे, दत्तराज नेरकर, प्रकाश जाधव व राजेश राठोड यांनी मोलाचे सहकार्य केले कार्यक्रमाच्या समापन वेळी उपस्थिताना व्यसनमुक्त भारताची शपथ घेतली.

# माथेरान पतसंस्थेचा ८७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा ; दुसऱ्या एटीएम सेवेचे उद्घाटन

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२४, माथेरान :** माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेचा ८७ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने पतसंस्थेच्या कार्यालयात श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच वर्धापनदिनाचे औचित्य साधून हुतात्मा स्मारकाजवळ पतसंस्थेच्या दुसऱ्या एटीएम मशीनचे उद्घाटन करण्यात आले.

नवीन एटीएम सेवेचे उद्घाटन पतसंस्थेचे विद्यमान सभापती अजय सावंत यांच्या हस्ते सकाळी अकरा वाजता श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी पतसंस्थेच्या उपसभापती विनंती घावरे, सचिव योगेश जाधव, सदस्य विवेक चौधरी, विजय कदम, रामचंद्र ढेबे, स्वाती कुमार, कुलदीप जाधव, चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, विजय सावंत, नितीन शेळके, अनंत शेलार, संदीप शिंदे, दत्ता सनगरे, अनिल गायकवाड, मंगेश सकपाळ यांच्यासह उपनगराध्यक्ष संतोष शेलार, विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, नगरसेवक प्रवीण सकपाळ, सचिन दाभेकर, किरण पेमारे, नगरसेविका रिझवाना महापुळे आणि नागरिक मोठ्या




संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना पतसंस्थेचे सभापती अजय सावंत यांनी सांगितले की, दस्तुरी नाक्यावर एटीएम सुविधा सुरू करण्याचा संस्थेचा मानस होता. मात्र याबाबत संबंधित प्रशासनाकडून अपेक्षित सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. अन्यथा पर्यटकांना अधिक सोयीस्कर सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न होता. नागरिक आणि सुज्ञ लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतल्यास भविष्यात आणखी एटीएम सुविधा सुरू करण्यासाठी पतसंस्था निश्चितच तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उपनगराध्यक्ष संतोष शेलार यांनीही पर्यटक आणि स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी एटीएम सुविधांची आवश्यकता अधोरेखित केली. माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना सहज आर्थिक व्यवहार करता यावेत यासाठी पुढाकार घेऊन अल्पावधीतच अधिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. नगरसेविका रिझवाना महापुळे यांनी पतसंस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, एटीएमची दुसरी शाखा सुरू झाल्याने स्थानिक नागरिकांसह हॉटेल, लॉज आणि पर्यटन व्यवसायाशी संबंधित घटकांना मोठा लाभ होणार आहे. पर्यटनाच्या दृष्टीने पतसंस्थेकडून सातत्याने नाविन्यपूर्ण संकल्पना राबविल्या जात असून हा उपक्रमही त्याचाच एक भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेने आपल्या ८७ वर्षांच्या यशस्वी वाटचालीत नागरिकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याबरोबरच पर्यटननगरी माथेरानमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे. नव्याने सुरू करण्यात आलेल्या एटीएम सेवेच्या माध्यमातून स्थानिक नागरिक तसेच हजारो पर्यटकांना आर्थिक व्यवहार अधिक सुलभ होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# थोडक्यात

## २०१० पूर्वी नियुक्त शिक्षकांना TET मधून सूट देण्याची मागणी



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२४, शहापूर (ठाणे) :** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ संलग्रित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक), जिल्हा ठाणे यांच्या वतीने २०१० पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षकांना ढएढ परीक्षेतून सूट देण्यात यावी तसेच त्यांना सेवा सुरक्षा प्रदान करण्यात यावी, या मागणीसाठी ठाणे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केंद्र सरकारकडे निवेदन सादर करण्यात आले.

हे निवेदन दिनांक १९ जून २०२६ रोजी देण्यात आले असून ते माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान तसेच इतर संसद सदस्यांना उद्देशून आहे. येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात संसदेत विधेयक आणून देशभरातील लाखो शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

या उपक्रमाला कोकण विभागीय अध्यक्ष गणेश पोतदार सर, प्रांत महिला सहआघाडी प्रमुख सुरेखा ताजवे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अंकुश माळी, कार्याध्यक्ष सुनिल पतंगराव, संघटन मंत्री मनोज डोहळे, प्रसिद्धीप्रमुख उमेश लोणे यांच्यासह शहापूर तालुका अध्यक्ष सतिश कुमावत, कार्यवाह पांडुरंग भोईर, कल्याण तालुका अध्यक्ष दिपक पडवळ, महिला आघाडी प्रमुख धनश्री पवार, तसेच कुमावत मॅडम, सुनिल पाटील, जगदीश पाटील, अण्णा कोठवळ, खवले सर यांसह मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. या निवेदनामुळे राज्यासह देशभरातील शिक्षकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, सरकारने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मुक्रमाबाद ठाणे हद्दीत लखमापुर फाटा येथे अंमली पदार्थ विरोधी पथकाची मोठी कारवाई

### ९ किलो ८५० ग्रॅम गांजा जप्त, दोघांना अटक



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२४, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत लखमापुर फाटा येथे अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, नांदेड पथकाने गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत मुक्रमाबाद परिसरातून दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्या विरुद्ध गु.र.नं.८२/२०२६ कलम ८ (C.) २० (B) (II)B NDPS ACT कलमान्वय अमली पदार्थ विरोधी टास्क नांदेड येथील सपोउपनिरिक्षक हाणमंत माणेजी जक्केवाड यांनी फिर्याद दिली. त्यांच्याकडून सुमारे ९ किलो ८५० ग्रॅम गांजा व एक मोटारसायकल असा एकूण ६ लाख ५२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुक्रमाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत आरोपी गांजा विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. या कारवाईत रामकिशन मुलगीर नटवे (रा. जळकोट, जि. लातूर) व शंकर सदानंद धोते (रा. लते गल्ली, जि. लातूर) यांना ताब्यात घेण्यात आले.

आरोपींकडून गांजा व मोटारसायकल जप्त करण्यात आली असून मुक्रमाबाद पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस.कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे पो.उपनिरिक्षक नितीन पवार करीत आहेत.

## आषाढीपूर्वी पंढरपूरला ५ कोटींची भेट :

### आ.आवताडेंच्या पाठपुराव्याने यात्राकर अनुदान मंजूर

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर नगरीतील विविध विकासकामांना चालना देण्यासाठी राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. यात्राकर रद्द केल्यामुळे नगरपरिषदांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदान योजनेअंतर्गत सन २०२६-२७ साठी एकूण ८ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी पंढरपूर नगरपरिषदेला तब्बल ५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे.

**आमदार आवताडेंचा पाठपुरावा यशस्वी**

याबाबत पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने भाविक आणि स्थानिक नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला आहे.

**नागरी सुविधा व विकासकामांना गती...**

आमदार समाधान आवताडे यांनी सदर निधीबाबत वारंवार शासन दरबारी पाठपुरावा केला होता. त्यांच्याच प्रयत्नांमुळेच पंढरपूर नगरपरिषदेला ५ कोटी रुपयांचे अनुदान मिळाल्याची भावना नागरिक व भाविकांमधून व्यक्त केली जात आहे. या निधीमुळे आगामी काळात शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती, भाविकांसाठीच्या सुविधा यांसारख्या मूलभूत सुविधा आणि विकासकामांना नवी गती मिळणार आहे.

**८ यात्रास्थळांपैकी पंढरपूरला सर्वाधिक**

राज्यातील त्र्यंबक, आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर, रामटेक, पैठण आणि अक्कलकोट या आठ यात्रास्थळ नगरपरिषदांच्या हद्दीत पूर्वी यात्राकर आकारला जात होता. तो बंद केल्यानंतर शासनाकडून सहायक अनुदान दिले जाते. यंदा आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्यामुळे एकट्या पंढरपूरला संपूर्ण ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, उर्वरित सात नगरपरिषदांसाठी एकूण ३ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शासनाने हा निधी कोणतीही कपात न करता तात्काळ संबंधित नगरपरिषदांना वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत. निधीचा विनियोग नियमानुसार करून त्याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त करून महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत निधी खर्च न झाल्यास अखर्चित रक्कम व्याजासह शासनाच्या खात्यात जमा करावी लागणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट केले आहे.